# यंदाच्या वर्षी १५,५०० रुपये बोनस!

## पालिकेचे कर्मचारी खुशीत; अनुदानित शाळांतील शिक्षकांत नाराजी

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)**: यंदा कोरोनाचे संकट असताना मुंबई महापालिका कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळेल की नाही, अशी शंका असतानाच महापालिका प्रशासनाने १५,५०० रुपये अनुदान जाहीर करून सगळ्यांनाच आश्चर्यचकित केले. महापालिका कर्मचाऱ्यांना मागील वर्षी १५ हजार रुपये सानुग्रह अनुदान मिळाले होते. कोरोनामुळे यंदा त्यात घट होण्याची शक्यता होती.

- पालिका कामगार/कर्मचारी : रु. १५,५००/-
- अनुदानित खासगी प्राथमिक शाळा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी : रु. ७,७५०/-
- महापालिका शाळेतील शिक्षणसेवक : रु. ४,७००/-
- अनुदानित खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षणसेवक : रु. २,३५०/-
- सामाजिक आरोग्य स्वयंसेविका (भाऊबीज भेट) : रु. ४,४००/-

पण, वाढच झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. मात्र, अनुदानित शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्धीच रक्कम मिळत असल्याने त्यांच्यात नाराजी आहे.

### अनुदानित शाळा शिक्षकांमध्ये नाराजी

महापालिका शाळा शिक्षकांना सानुग्रह अनुदानापोटी मिळणाऱ्या रकमेच्या तुलनेत अनुदानित खासगी शाळांच्या शिक्षकांना निम्मी रक्कम मिळत आहे, त्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे. आम्हीही शिकविण्याचेच काम करतो. आमच्या शाळांचा स्तरही महापालिका शाळांच्या बरोबरीने आहे. आम्हीही माणसेच आहोत. मग आम्हाला सानुग्रह अनुदानाची रक्कम कमी का? असा त्यांचा प्रश्न आहे. महापालिका शाळांच्या शिक्षकांच्या तुलनेत खासगी अनुदानित शाळांच्या शिक्षकांना अर्धी रक्कम आणि शिक्षणसेवकांनाही पालिका शाळांच्या शिक्षणसेवकांपेक्षा अर्धी रक्कम मिळत आहे. त्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे.



### माध्यमिक शाळांना अनुदान नाहीच

''जुन्या ४९ माध्यमिक शाळांना सानुग्रह अनुदान दिले जात नाही, तसेच महापालिकेच्या अखत्यारितील १९० मुंबई पब्लिक स्कूल (एमपीएस)च्या शिक्षकांनाही सानुग्रह अनुदान नाही. यंदा तर या शाळांचा दहावीचा रिझल्ट ९३ टक्के लागला आहे. त्यामुळे महापालिकेच्या शिक्षण खात्याची सर्वत्र वाहवा होत आहे. महापालिकेचा शिक्षणाचा दर्जा खासगी शाळांच्या बरोबरीने आल्याची प्रतिमा जनमानसात निर्माण झाली आहे. तसेच 'कोरोना योद्धे' म्हणूनही त्यांनी उत्तम काम केले आहे. त्यांनाही सानुग्रह अनुदान नाही. त्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे,'' असे मुंबई शिक्षक परिषदेचे कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी सांगितले.

### तिजोरीवर बोजा नाही

सानुग्रह अनुदानामुळे महापालिकेच्या तिजोरीवर किती बोजा पडेल, असे एका अधिकाऱ्याला विचारले असता, त्यांनी सांगितले की, ''सानुग्रह अनुदान मिळाले यात आश्चर्य नाही आणि ५०० रुपये जास्त मिळाले यातही आश्चर्य नाही. कामगारांच्या सानुग्रह अनुदानासाठी अर्थसंकल्पातच १५३ कोटी १४ लाख रुपयांची तरतूद आहे. त्या तरतुदीनुसार सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे कोरोनाकाळात सानुग्रह अनुदान जाहीर केले याचे कौतुक नाही आणि सानुग्रह अनुदानामुळे पालिकेच्या तिजोरीवर भारही पडलेला नाही.''

# 'बेस्ट' कामगारांच्या नशिबी प्रतीक्षाच!

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)**: मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांबरोबरच 'बेस्ट'च्या कामगारांनाही सानुग्रह अनुदान जाहीर होईल, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, त्यांच्या वाट्याला प्रतीक्षाच आली आहे. दरम्यान, ''सानुग्रह अनुदानाबाबत दोन दिवसांत निर्णय होईल,'' असे 'बेस्ट'चे अध्यक्ष प्रवीण शिंदे यांनी सांगितले.

आर्थिक कोंडीत अडकलेल्या 'बेस्ट' उपक्रमातील कामगारांना पगार देण्यासाठी 'बेस्ट' उपक्रमाच्या नाकीनऊ येतात. त्यात कोरोनामुळे आर्थिक कोंडी वाढलीच आहे. त्यामुळे यंदा दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान मिळेल की नाही, याची कर्मचाऱ्यांना प्रतीक्षाच करावी लागणार आहे. दरम्यान, '''बेस्ट' उपक्रमातील कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी



सानुग्रह अनुदान देण्याबाबत लवकरच निर्णय घेऊ,'' असे 'बेस्ट' समिती अध्यक्ष प्रवीण शिंदे यांनी सांगितले.

आर्थिक संकटात सापडलेल्या 'बेस्ट' उपक्रमातील कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदानासाठी आंदोलनाचे हत्यार उपसावे लागते. यंदा तर कोरोनामुळे 'बेस्ट' उपक्रमाचे आर्थिक गणित बिघडले आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान मिळेल का, याकडे कर्मचाऱ्यांचे डोळे लागले आहेत.

गेल्या वर्षी आंदोलन केल्यानंतर ५,५०० रुपये सानुग्रह अनुदान मिळाले होते. त्याच्या आधीच्या वर्षी सानुग्रह अनुदान जाहीर करून त्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली होती. तर दोन वर्षांपूर्वी त्यांना झुलवत ठेवण्यात आले होते. आता तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे राज्याचे मुख्यमंत्री आणि महापालिकेतही शिवसेनेची सत्ता असून, 'बेस्ट' समितीवर प्रवीण शिंदे शिवसेनेचे नगरसेवक अध्यक्ष म्हणून विराजमान आहेत. त्यामुळे 'बेस्ट' कामगारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पालिका कर्मचाऱ्यांबरोबर आपल्यालाही सानुग्रह अनुदान जाहीर होईल, अशी आशा कर्मचाऱ्यांना होती. परंतु, तूर्तास तरी 'बेस्ट' कर्मचाऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे.

# दिवाळी सणासाठी जनतेला रवा, मैदा उपलब्ध करून द्या

## भाजप नेत्या चित्रा वाघ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)** : दिवाळी सण काही दिवसांवर आला असून जनतेला रवा, मैदा, साखर, तेल व तूप हे स्वस्त धान्य दुकानात (रेशनिंग वर) रास्त भावात सरकारने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भाजपच्या उपाध्यक्षा चित्रा वाघ यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे. चित्रा वाघ म्हणतात की, ''यावेळेची दिवाळी कोरोनाच्या सावटाखाली आहे. त्यात 'लॉकडाऊन'ने जनतेचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडलेले आहे. त्यामुळे दिवाळी सण कसा साजरा करावा, हा जनतेपुढे यक्षप्रश्न आहे. या कठीण काळात घरसंसार चालविणे गृहिणींसाठी तारेवरची कसरत आहे. त्यात मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम व उत्तर महाराष्ट्रात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जनतेची दिवाळी गोड व्हावी, यासाठी सरकारकडून दिलासा म्हणून गहू, तांदूळ, चणाडाळ सोबतच रवा, मैदा, साखर, तेल व तूपही रास्त भावात स्वस्त धान्य दुकानात (रेशनिंगवर) उपलब्ध करून द्यावे,'' अशी मागणी वाघ यांनी केली आहे.

''राज्याचे कुटुंबप्रमुख म्हणून आपली जबाबदारी ओळखत आपण गोरगरीब जनतेची दिवाळी गोड कराल,'' अशी अपेक्षाही वाघ यांनी मुख्यमंत्र्यांकडून केली आहे.

# दार उघड बये दार उघड!

- 'देऊळ बंद'च्या विरोधात साधू-संतांचे बेमुदत धरणे आंदोलन
- तुषार भोसलेंची घोषणा; गुरुवारपासून 'तुळजाभवानी'समोर जागर

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)** : राज्यातील बंद असलेली मंदिरे १ नोव्हेंबरपर्यंत उघडण्याच्या मागणीला राज्य सरकारने कोणताही प्रतिसाद न दिल्याने 'आध्यात्मिक समन्वय आघाडी'तर्फे गुरुवार, ५ नोव्हेंबरपासून श्रीक्षेत्र तुळजापूर येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. आई तुळजाभवानीलाच आता 'दार उघड बये दार उघड' अशी आर्त साद घालण्यात येणार आहे. ''मंदिरे उघडण्यास सरकार परवानगी देईपर्यंत, हे आंदोलन चालू राहणार आहे,'' अशी घोषणा आध्यात्मिक समन्वय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांनी केली आहे.

आचार्य भोसले यांनी म्हटले आहे की, ''राज्यपाल महोदयांना भेटून 'आध्यात्मिक समन्वय आघाडी'ने राज्य सरकारकडे १ नोव्हेंबरपर्यंत मंदिरे उघडण्याची मागणी केली होती. मात्र, राज्य सरकारने त्याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. तसेच साधू-संतांच्या शिष्टमंडळाशी चर्चादेखील केली नाही. राज्यातील भाविक जनतेच्या भावनांपेक्षा ठाकरे सरकारला आपला अहंकार जपायचा आहे. त्यामुळे आता राज्यातील



भाविक जनता मंदिरांवर लावलेले अन्याय आणि अहंकाराचे टाळे तोडून मंदिरे उघडणे सुरू करणार आहे. परंतु, लाखो कुटुंबांची उपजीविका अवलंबून असलेली सर्वच मोठी देवस्थाने राज्य सरकारच्या अधिपत्याखाली आहेत. त्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवून देव-भक्तांच्या आड येण्याचे पाप हे हिरण्यकश्यपू राज्य सरकार करत आहे.

या विरोधात 'आध्यात्मिक समन्वय आघाडी' गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन करणार असून, मंदिरे उघडण्याची घोषणा होत नाही आणि आम्हाला आई तुळजाभवानी मातेचे दर्शन होत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन कोणत्याही परिस्थितीत आम्ही मागे घेणार नाही,'' अशी घोषणा आचार्य तुषार भोसले यांनी केली. आचार्य तुषार भोसले यांच्यासह प्रमुख साधू-संत, धर्माचार्य आंदोलन करतील. या आंदोलनात सर्व धार्मिक-आध्यात्मिक संघटना, स्थानिक व्यावसायिक, तसेच सर्व राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधी यांनाही सहभागी होण्याचे आवाहन 'आध्यात्मिक समन्वय आघाडी'तर्फे करण्यात आले आहे.

''राज्याचे प्रमुख म्हणून मंदिरांच्या दरवाजांचे टाळे उघडण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. मात्र, त्यांनी आमची मागणी ऐकली नाही. टाळे तोडण्याची इशारा दिला, तरीही सरकार ढिम्मच आहे. त्यामुळे आता आई तुळजा भवानीलाच 'दार उघड बये दार उघड!' अशी आर्त साद घालण्यात येणार आहे. ५ नोव्हेंबरपासून छोट्या-छोट्या मंदिरांना लावलेले अन्याय-अहंकाराचे टाळे तोडण्यात येईल. मात्र, मोठ्या मंदिरांसमोर पोलीस बंदोबस्त असल्याने देवीचा जागर, गोंधळ, भारूड अशी गाणी गाऊन शासनाचा अहंकार दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मंदिर खुले होईपर्यंत हे आंदोलन चालू राहील,'' असा निर्धार आचार्य तुषार भोसले यांनी व्यक्त केला.

# 'जन आक्रोश मोर्चा'तील कार्यकर्त्यांची धरपकड




**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी):** महाराष्ट्रात पत्रकारांवर गुन्हे दाखल करण्याच्या घटना, प्रसिद्धी माध्यमांची गळचेपी केली जात असल्याच्या निषेधार्थ मुंबई भाजपतर्फे सोमवार, २ नोव्हेंबर रोजी 'जन आक्रोश आंदोलन' करण्यात आले. मात्र, यावेळी मुंबई पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड करत जमावाला पांगवून लावले, असा आरोप भाजपतर्फे करण्यात आला.

महाराष्ट्रात अभिव्यक्ति स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. महाराष्ट्रात जी आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याच्या विरोधात आज भाजप मुंबईतर्फे 'जन आक्रोश मोर्चा' आयोजित केला होता, त्यावेळेस पोलिसांकडून कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली, अशी माहिती ट्विटरद्वारे देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील आणीबाणीचा काळ कधी संपणार?, महाराष्ट्रात लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम का सुरू आहे?, अशा घोषणा देत सोमवारी मंत्रालयाबाहेर 'जन आक्रोश आंदोलन' सुरू करण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले.

**ATCOM TECHNOLOGIES LIMITED**
CIN No.L29299MH1989PLC054224
Regd. Office- 2F, Court Chambers, New Marine Lines, Mumbai 400020 Tel No.022-22007001
Website:www.atcomtech.co.in
Email: atcomcs@gmail.com

**NOTICE**
Notice is hereby given pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (LODR) Regulation, 2015, that the meeting of the board of directors will be held on 10th November 2020 at Flat No 5, Sannidhan, Plot No. 145,Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai 400031 to consider and approve the Unaudited Financial Results for the quarter and half year ended September 30, 2020. The said notice can be accessed at the company website above and at the website of the National Stock Exchange and Bombay Stock Exchange.
For Atcom Technologies Limited
Sd/-
Vikram Doshi
Managing Director
Place: Mumbai
Date :2/11/2020

**VAARAD VENTURES LIMITED**
CIN: L65990MH1993PLC074306
Flat No.5, Sannidhan, Plot No. 145, Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai -400031
Tel: 022-35566211
E-mail : cs.dept@vaaradventures.com
Website:www.vaaradventures.com

**NOTICE**
Notice is hereby given pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (LODR) Regulation, 2015, that the meeting of the board of directors will be held on 10th November, 2020 at Flat No.5, Sannidhan, Plot No. 145,Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai-400 031 to consider and approve the Unaudited Financial Results for the quarter and half year ended September 30, 2020. The said notice may be accessed at the company website above and at the website of the Bombay Stock Exchange.
For Vaarad Ventures Limited
sd/-
Leena Doshi
Managing Director
Place: Mumbai
Date :2/11/2020

**यशो इंडस्ट्रीज लिमिटेड**
YASHO INDUSTRIES
**कार्यालय क्र.** १०१/१०२, पेनुन्सिला हाईट्स, सी. डी. बर्फीवाला मार्ग, जुहू लेन, अंधेरी (प), मुंबई - ४०० ०५८, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्र.: +९१-२२-६२५१०१००, फॅक्सः +९१-२२-६२५१०१९९
ईमेल आयडीः info@yashoindustries.com । वेबसाईटः www.yashoindustries.com
सीआयएन क्र.: L74110MH1985PLC037900

**सूचना**
सेबी (सूचीबद्धता दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन २९ अन्वये, याद्वारे सूचना देण्यात येते की, इतर कामांसोबतच, दि. ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षाकरिता मर्यादित पुनरावलोकन अहवालासह अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार, दि. ११ नोव्हेंबर, २०२० रोजी दु. ०३.०० वा. घेण्यात येणार आहे.
सदर माहिती कंपनीच्या वेबसाईट www.yashoindustries.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com येथे देखील उपलब्ध आहे.
यशो इंडस्ट्रीज लिमिटेड
सही/-
कोमल भगत
कंपनी सचिव
दिनांक: ०३.११.२०२०
ठिकाण: मुंबई

# वापरलेले 'पीपीई' किट्स, मास्कच्या विल्हेवाटीसाठी ज्वलनभट्टी वापरणार

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)**: कोरोला प्रतिबंध करताना वापरलेले किट्स, मास्क यांची विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महापालिका ज्वलनभट्टीचा वापर करणार आहे.

कोरोनाकाळात सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणात वापरलेल्या 'पीपीई' किट्स, मास्क, हातमोजे, फेस शिल्ड, डायपर आदी साहित्यांचा वापर करण्यात आला. वापरलेले साहित्य रुग्णालयात पडून आहे. वापरलेल्या या साहित्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने ज्वलनभट्टीचा वापर करून रुग्णालयातच साहित्यांची विल्हेवाट लावण्याचे धोरण आखले आहे.

जगभरात कोरोना विषाणूने थैमान घातल्याने त्याची धग मुंबईतही पोहोचली. मुंबईत दहा हजारांहून अधिक रुग्ण दगावले आहेत. मार्च महिन्यांत कोरोनाचा मुंबईत प्रादुर्भाव वाढला. केंद्र आणि राज्य शासनाच्या कठोर



उपाययोजनांमुळे कोरोना आटोक्यात आला. दरम्यान, रुग्णांवरील उपचारासाठी रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना 'पीपीई' किट्स, हातमोजे, मास्क, फेस शिल्ड, डायपर आदी आवश्यक साहित्य सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. मात्र, वापरलेल्या साहित्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही सक्षम यंत्रणा पालिकेकडे उपलब्ध नव्हती. वापरलेले हे साहित्य रुग्णालयात पडून आहे. कोरोनाचा यामुळे प्रसार होण्याचा धोका संभवतो. सुधार समिती अध्यक्ष सदानंद परब यांनी संबंधित साहित्याचा गंभीर मुद्दा ठरावाच्या सूचनेद्वारे महासभेच्या निदर्शनास आणून दिला. तसेच वापरलेले 'पीपीई' किट्स, मास्क, हातमोजे, फेस शिल्ड, डायपर आदी साहित्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई मनपाच्या प्रमुख आणि १६ उपनगरीय रुग्णालयात ज्वलनभट्टी यंत्रणा उभारावी, अशी सूचना केली आणि ती मंजूर करण्यात आली. त्यामुळे वापरलेले साहित्याची आता ज्वलनभट्टीद्वारे विल्हेवाट लावण्यात येणार आहे.

# 'कोरोना'ची लस आल्यास प्रथम आरोग्यसेविकांना देणार

## महापौर किशोरी पेडणेकर यांची माहिती

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)** : ''कोरोनावर अद्याप कोणतीही लस उपलब्ध झालेली नाही. परंतु, लस उपलब्ध झाल्यास प्रथम ती आरोग्यसेविकांना देण्यात येईल,'' अशी माहिती महापौर किशोरी पेडणेकर यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

नायर आणि केईएम रुग्णालयांत ऑक्सफर्ड विद्यापीठाने तयार केलेल्या 'कोविड-१९' लसीची मानवी चाचणी सुरू करण्यात आली. आतापर्यंत १६३ स्वयंसेवकांना 'कोव्हिशिल्ड' देण्यात आली असून, कोणतेही दुष्परिणाम झाले नाहीत. त्यामुळे मुंबईत कोरोनावर लस उपलब्ध झाल्यास वैद्यकीय कर्मचारी, 'कोविडलढ्या'त प्रत्यक्ष सहभागी कर्मचाऱ्यांना कोरोना लस दिली जाईल. तसेच प्रत्येक विभागनिहाय माहिती घेऊन




शिबीर आयोजित करून या कर्मचाऱ्यांना लस देण्याची व्यवस्था केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### यांना मिळणार लस

परिचारिका, डॉक्टर, वॉर्डबॉय, तंत्रज्ञ, आरोग्यसेविका, सफाई कामगार अशा कोरोनालढ्यात थेट सहभागी झालेल्या सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना लस दिली जाणार आहे. तर खासगी रुग्णालयातील कोरोना लढ्यात थेट सहभाग असलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांची माहिती, संपर्क क्रमांक महापालिकेने घेतले असून लस उपलब्ध होताच त्यांनाही दिली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# आठवडाभरात सोन्याच्या दरात १.२ टक्क्यांची घसरण

**मुंबई, दि. २ (प्रतिनिधी)** : जगभरात कोरोनाच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ झाल्याने, तसेच 'कोविड'मुळे 'लॉकडाऊन' असल्याने सोने आणि कच्च्या तेलाची मागणी घटली. मागील आठवड्यात अमेरिकेच्या डॉलरमूल्यात वाढ झाल्याने स्पॉट गोल्डचे दर १.२ टक्क्यांनी घसरले, तसेच अमेरिकेकडून कोरोना निधीची कोंडी झाल्याने सुरक्षित मालमत्ता असलेल्या सोन्याच्या मागणीवरही परिणाम झाला असल्याचे 'एंजल ब्रोकिंग लिमिटेड'चे गैर कृषी वायदा व चलन संशोधन उपाध्यक्ष प्रथमेश माल्या यांनी सांगितले. दरम्यान, सध्या बाजारात सोन्याचा भाव ५२ हजार



८१५ रुपये प्रतितोळा सुरू आहे.

अमेरिकेच्या मदतनिधी करारातील अपयशी प्रयत्नांनंतर, अमेरिकी प्रशासनाने आगामी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीपर्यंत निधीचा प्रस्ताव पुढे ढकलला. कमकुवत कामगार बाजार असूनही, अमेरिकेची अर्थव्यवस्था २०२० च्या तिसऱ्या तिमाहीत वेगाने सुधारली. त्यामुळे पिवळ्या धातूच्या किमतीवर दबाव आला. तथापि, कोरोना विषाणूच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ झाल्याने जागतिक अर्थकारणावर दबाव येऊन सोन्याच्या नुकसानीला मर्यादा आल्या. बहुतांश देशांनी नव्याने 'लॉकडाऊन' लावल्याने बाजाराच्या जोखिमेवर परिणाम होऊन गुंतवणूकदार सोन्याकडे वळाले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोन्याचे दर वाढण्याची शक्यता आहे.

कच्चे तेल मागील आठवड्यात, साथीचा विस्तार आणि लिबियन तेल उत्पादनात सुधारणा झाल्याने 'डब्ल्यूटीआय क्रूड'चे दर दर टक्क्यांनी कमी झाले. अमेरिका, युरोप आणि इतर देशांमध्ये 'कोविड-१९' रुग्णांची संख्या वाढवत असल्याने दरात घसरण सुरू झाली. विषाणूमुळे कठोर निर्बंधांची, तसेच जागतिक आर्थिक सुधारणेत पुन्हा मंदी येण्याची भीती निर्माण झाली आहे. अमेरिकेच्या 'एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशन'ने नोंदविले की, अमेरिकेच्या क्रूडसाठ्यात ४.३ दशलक्ष बॅरलने वाढ झाली. यामुळेही तेलातील नुकसान वाढले. मागील आठवड्यात तेल उत्पादन वाढल्याने साठ्यातही उच्चांक गाठला गेला.

**Vinyl Chemicals (India) Limited**
**CIN:** L24100MH1986PLC039837
**Regd. Office:** 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
**Tel:** 2282 2708 **Fax:** 2204 3969 **E-mail:** cs.vinylchemicals@pidilite.com **Website:** www.vinylchemicals.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & HALF YEAR ENDED 30.09.2020**
(₹ In lakhs)

| Particulars | For the Quarter ended | | For the Half Year ended | |
|---|---|---|---|---|
| | 30.09.2020 | 30.09.2019 | 30.09.2020 | 30.09.2019 |
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited |
| Total income | 8178 | 10613 | 11190 | 19295 |
| Profit/(loss) for the period before tax | 201 | 343 | 359 | 447 |
| Profit/(loss) for the period after tax | 149 | 261 | 265 | 333 |
| Total Comprehensive Income for the period [comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 148 | 261 | 263 | 333 |
| Equity Share Capital (Face value of share: ₹ 1) | 183 | 183 | 183 | 183 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | |
| Earnings per share of ₹ 1 each in ₹: | | | | |
| Basic | @0.81 | @1.43 | @1.45 | @1.82 |
| Diluted | @0.81 | @1.43 | @1.45 | @1.82 |

@ For the period only and not annualised

**Notes:**
The above is an extract of the detailed Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Unaudited Financial Results are available on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company's Website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 2nd November, 2020

**M.B. PAREKH**
**Chairman & Managing Director**
(DIN: 00180955)